## ❖ इतिहास

जत हे रामायणकाळातील गाव असल्याचे मानले जाते. हा प्रदेश दंकारण्यातले जयंतीनगर होते असे मानले जाते. इ.स.११ व्या व १२ व्या शतकातील काही शिलालेख जत तालुक्याच्या उमराणी, कोळेगिरी, येथील पुरातन मंदिरात आढळून येतात. कलचुरी घराण्यातील राजा बिज्जलदेव याने या मंदिरांना दान दिल्याचे उल्लेख आढळतात.

## ❖ धार्मिक

जत येथील यल्लम्मा (रेणुका) देवींची यात्रा प्रसिद्ध आहे. ही यात्रा महाराष्ट्रातील मोठ्या यात्रापैकी मानली जाते.

## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.किमी.) | २,२५,८२८ | • महसूल मंडळे | ६ |
| • गावांची संख्या | ११७ | • जि.प.सर्कल | ९ |
| • ग्रामपंचायती | ११७ | • प्रा.आरोग्य केंद्रे | ८ |
| • नगरपरिषद | नाही | • शाळांची संख्या | ४१६ |
| • पोलीस ठाणी | २ | • महाविद्यालये | २ |

## धानम्मादेवी मंदिर

हे दैवत वीरशैव समाजाचे आहे. धानम्मादेवी मंदिर जत पासून २२ किमी अंतरावर पूर्वेला गुड्डापूर या गावात आहे. बाराव्या शतकात समाजातील अनिष्ट चालीरिती, अंधश्रद्धा व रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी धानम्मा देवीने आई ऐशिरस्मा व वडील अनंतराय यांच्या घरी जन्म घेतला अशी आख्यायिका आहे. धानम्मा ही एक समाजसुधारक आहे. वयाच्या १० व्या वर्षापासूनच भारतभर भ्रमण करून समाजातील जातीभेद, अनिष्ट रुढी, परंपरा, सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिला पार्वतीचा अवतार मानले जाते. हे मंदिर हेमांडपंथी शैलीतील आहे. या मंदिराच्या पश्चिमेला तिचे पती सोमनाथ यांची समाधी आहे. धानम्मादेवीने आपले अवतार कार्य संपल्यानंतर गुड्डापूर या गावी समाधी घेतली. हे मंदिर म्हणजे एक सुसज्ज मंगल कार्यालय आहे. येथे दरवर्षी शेकडो विवाह होतात.

Scanned by CamScanner

## श्री बनशंकरी देवस्थान

जत तालुक्यात उत्तरेला २ किमी अंतरावर पाच हजार लोकवस्तीचे गाव आहे. गावाशेजारील छोट्या डोंगराच्या कुशीत हिरवेगार घनदाट वन आहे. या गर्द वनराईत श्री बनशंकरीचे देवस्थान आहे. कायम दुष्काळी भागात वसलेले हे ठिकाण वाळवंटातील ओॲसिस प्रमाणे एक सुंदर पर्यटनस्थळ आहे.

चारी बाजूला छोट्या टेकड्या, मधोमध लहानशी दरी, त्या दरीमध्ये आंबा, चिंच, जांभूळ, वड, निलगिरी इ. उंचच उंच वृक्ष आहेत.

## श्री मलकार सिद्‌ध

उमदी येथील श्री मलकार सिद्‌ध देवस्थान दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकात प्रसिद्ध व एक जागृत देवस्थान आहे. १९६१ मध्ये देवाच्या मूर्तीला सुवर्णलेप दिल्यानंतर मलकारसिद्‌ध देवाच्या यात्रेला प्रारंभ झाला. या देवाची यात्रा वर्षातून दोन वेळा भरते.

कुचणूर मादण्णा व मलकारासिद्‌ध देवाची भेट झाली असे मानले जाते. मलकार सिद्‌ध देवाचे भिवर्गी हे मूळ गाव श्री आमोगासिद्‌ध देवाच्या औदुसिद्‌ध, बिलेणसिद्‌ध, स्वामाणमुथ्या, कन्नमुथ्या चार मुलापैकी कन्नमुथ्यायाचा मुलगा मलकारसिद्ध देवाला सहाजण भाऊ. उमदीतील पाटील रेवळसिद्ध हडदर याला जोतकल्लाप्पा पिडत असल्याने त्या पाटलाने भिवर्गीला जावून श्री मलकारासिद्धला बोलाविले. त्यानंतर मलकारसिद्ध हा त्या शिवारात आला व आरोळी दिली. त्यावेळी जोतकल्लाप्पा येथून पळून गेला. तेव्हापासून मलकारासिद्ध येथे स्थायिक झाला. अशी आख्यायिका आहे. या मंदिराला ६२ वर्षातून एकदा सुवर्णलेप केला जातो.

## साहित्यपुष्पे

* विद्रोही साहित्य संमेलन व कवी साहित्य संमेलन घेतले गेले.
* श्रीपाद जोशी, सुनंदा, शेळके, श्रीकांत कोकरे, मच्छिंद्र ऐनापुरे, नितीन कांबळे (खिलाडी) इ. लेखक, कवी
* तमाशाचा फड गाजविणारे - संगाप्पा चंदनशिवे, विजय चव्हाण, रमेश वाघमारे, खलाटीकर
* सनईवादक - शिवमूर्ती जाधव
* ढोलकी वादन करुन व्यसनमुक्तीवर प्रबोधन करणारे रामभाऊ हेगडे
* स्त्री भूमिकेतील लावण्या सादर करणारे - फैयाज मकानदार (जत)

Scanned by CamScanner

* सांप्रदायी परंपरा टिकवणारे - सांप्रदाय भजनी मंडळ (सिंगापूर)
* भारुडांचा कार्यक्रम करणारी - संजीवनी माने
* किर्तनातून समाजजागृती करणारे - रामचंद्र कुलकर्णी, हणमंत महाराज, अशोक महाराज, रामानंद महाराज
* फिल्मी कलाकार - नासीर उर्फ लल्लुखान बिराजदार (डफळापूर) चित्रपट - पैसा रे पैसा, वनवा

## देवस्थाने

- जत येथील यल्लमादेवी मंदिर, श्री राममंदिर
- गुड्डापूर येथील दानम्मा मंदिर
- बनाळी येथील बनशंकरी मंदिर
- गिरगांव येथील डोंगरावरील श्री लक्ष्मी मंदिर
- बिळूर येथील मोठा मठ
- सोर्डी येथील श्री दत्त मंदिर, मलकारसिद्ध
- गुडघरी सिद्धनाथ येथे हेमाडपंथी देवालय.

Scanned by CamScanner